बारामती विभाग

पुणे जिल्हा

पुणे, शुक्रवार, ११ डिसेंबर २०२०

५

सकाळ » TODAY

» अवतीभवती

## बारामतीतील विद्या प्रतिष्ठानच्या आर्किटेक्चर महाविद्यालयाला पुरस्कार



बंगळूर : महाराष्ट्रातील सर्वोत्तम वास्तुशास्त्र महाविद्यालय म्हणून पुरस्कार स्वीकारताना प्राचार्या राजश्री पाटील.

**बारामती :** बिगेनअप रिसर्च इंटेलिजन्स प्रायव्हेट लिमिटेड यांच्यामार्फत देश-पातळीवरील गुणवत्ता शिक्षण या श्रेणीसाठी देण्यात येणारा नॅशनल आर्किटेक्चर ॲण्ड इंटिरिअर डिझाइन एक्सलन्स ॲवॉर्ड-२०२० बारामतीमधील विद्या प्रतिष्ठान स्कूल ऑफ आर्किटेक्चर या महाविद्यालयाला मिळाला आहे. यामध्ये २०२० मधील महाराष्ट्रातील सर्वोत्तम वास्तुशास्त्र महाविद्यालय म्हणून या महाविद्यालयाची निवड झाली. सदर पुरस्काराचे वितरण नुकतेच बंगळूर येथे करण्यात आले. विद्या प्रतिष्ठान संस्थेच्या उद्दिष्टानुसार ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचा शैक्षणिक विकास होण्यासाठी संस्थेच्या विश्वस्त सुनेत्रा पवार यांच्या मार्गदर्शनानुसार महाविद्यालयाने यामध्ये सहभाग नोंदविला होता. संस्थेचे उपाध्यक्ष ॲड. अशोक प्रभुणे, सचिव ॲड. नीलिमा गुजर, खजिनदार युगेंद्र पवार, विश्वस्त डॉ. राजीव शहा, किरण गुजर, मंदार शिकची, व्यवस्थापन समिती सदस्य, रजिस्ट्रार श्रीश कंभोज यांनी महाविद्यालयाच्या प्राचार्या राजश्री पाटील, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

Reference: Daily Sakal Marathi News Paper
Dated 11/12/2020.
Supplement Sakal Today
Page No:- 05.